# बातमीपत्र

## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर

## माहिती कक्ष, दि. २१ जून २०२३

---

पोलीस आयुक्तालय कार्यालय सोलापूर शहर चे अस्थापनावर पोलीस शिपाई साठी ३२ पद व पोलीस चालक पदासाठी १६ पद असे एकूण ४८ पदासाठी भरतीकरीता २३३० ऐवढे उमेदवाराचे अर्ज प्राप्त झाले होते.

पोलीस शिपाई भरती २०२२-२०२३ च्या अनुषंगाने पुरूष, महिला, माजी सैनिक यांची शारीरीक चाचणीची प्रकिया दिनांक १९/०६/२०२४ ते दिनांक २१/०६/२०२४ पर्यत घेण्यात आली. सदर शारीरीक चाचणी दरम्यान पावसाचा व्यत्यय आला नाही.

शारीरीक चाचणी प्रकियेकरीता उमेदवारांची आकडेवारी बाबतची माहिती खालीलप्रमाणे.

| अक्र | उमेदवार | बोलवण्यात आलेले एकूण उमेदवार | प्रत्यक्षात हजर असलेले एकूण उमेदवार | एकूण पात्र उमेदवार | एकूण अपात्र उमेदवार |
|---|---|---|---|---|---|
| १. | पुरूष | १८२६ | ११०२ | ९७७ | १२५ |
| २. | महिला | ४७४ | ३१७ | २४२ | ७५ |
| ३. | माजी सैनिक | ३० | २० | १७ | ०३ |
| | एकूण | **२३३०** | **१४३९** | **१२३६** | **२०३** |

तसेच पोलीस भरती संपुर्ण महाराष्ट्रात एकाच वेळी वेगवेगळया पदासाठी घेण्यात आली असल्याने एखादा उमेदवार यांना दि. १९/०६/२०२४ ते दि २१/०६/२०२४ रोजी दरम्यान पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर येथे घेण्यात आलेल्या शारीरीक चाचणी च्या प्रकियेस हजर राहू शकला नाही. अशा उमेदवारास पोलीस आयुक्तालय सोलापूर शहर यांचे वतीने दि. २५/०६/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजल्यापासुन शारीरीक चाचणी प्रक्रियेची संधी उमेदवारास देण्यात आली आहे.

दि. १९/०६/२०२४ ते दि २१/०६/२०२४ रोजी दरम्यान उमेदवार शासकीय नोकरी प्रक्रिये करीता इतर घटकांमध्ये हजर राहिला असेल तेथील हजेरी नोंदीचा पुरावा सादर करुन दि. २५/०६/२०२४ रोजी सकाळी ०६.०० वाजता पोलीस मुख्यालय सोलापूर शहर, येथे शारिरीक चाचणी प्रक्रियेस हजर राहु शकतात, असे आवाहन मा. पोलीस आयुक्त, सोलापूर शहर यांनी केले आहे.

सदर बाबत आपले दैनिकात प्रसिध्दी करणेस विनंती आहे.